# मौसम मित्र

पर्यावरण एवं जलवायु के अधिकारों पर युवाओं की आवाज - महाराष्ट्र

पर्यावरण वार्षिक अंक - १ महाराष्ट्र राज्य सन -२०२३

## पर्यावरण मित्र

### 'आमचा अधिकार -आमचा आवाज'

जर्मनी येथील टेरे डेस होम्स यांच्या सहकार्याने भारतातील युवा सदस्य हे सहयोगी संस्थांच्या मदतीने स्वच्छ हवा, निरोगी वातावरण यासाठी एक दशकापासून काम करत आहेत. यामध्ये नैसर्गिक संसाधने , स्वच्छ हवा, पाणी यांचे संवर्धन करणे या मुद्द्यांचा समावेश आहे. तसेच सेंद्रिय शेती आणि अन्न सुरक्षा , पर्यावरण हक्क याला देखील प्रोत्साहन दिले जात आहे. लोकल टू ग्लोबल च्या माध्यमातून तरुणांच्या नेतृत्वाखालील लोकांचे बळकटीकरण, एकत्रीकरण आणि त्यांची क्षमता वाढवण्यासाठी काम केले जात आहे. यामध्ये ज्ञान, कृती आणि धोरणावर प्रभाव टाकणाऱ्या कृती केल्या आहेत.

शिक्षण: पर्यावरण आणि हवामान यावर काम करणाऱ्या तरुणांना विज्ञान आणि न्यायाच्या उच्च तार्किक विषयांवर एक चांगला दृष्टीकोन तयार करण्यासाठी पर्यावरण जागरूकता आणि सक्षमीकरण विकास यांचे शिक्षण दिले जाते.

महाराष्ट्र मध्ये ५०० पेक्षा अधिक युवक स्थानिक पातळीवर असलेल्या समस्या सोडवण्याचे काम करत आहे. ग्रामीण व शहरी पातळीवर बदलत्या हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. युवक एकत्र येऊन जनजागृती, पर्यावरण पूरक उपक्रम आणि कृती करत आहेत.

स्थानिक ते जागतिक- स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणाच्या हक्कासाठी युवकांचे नेतृत्व, क्रियाकलाप, संघटन आणि क्षमता निर्माण करून मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणे.



***जनजागृती अभियान*** – शहरातील युवक गटातील मुलींनी पथनाट्याच्या माध्यमातून माध्यमिक शाळेमध्ये पर्यावरण, बाल-हक्क , व्यसनमुक्ती , शिक्षण , स्थानिक समस्या आदी विषयवार जनजागृती केली आहे.

***युवक गट अभ्यास भेट*** - शहरातील युवक कचरा समस्या वरती काम करत आहे. त्यांना या प्रक्रियेतील अधिक माहिती मिळावी आणि प्रत्यक्ष पणे हे काम कसे चालते हे समजण्यासाठी 'स्वच्छ संस्था ' यांच्या कार्यक्षेत्रात अभ्यास भेट आयोजित केली होती.



**जागतिक वन दिवस** –महाराष्ट्र येथील गटासोबतस्थानिक पातळीवरती जागतिक वन दिवस साजरा करण्यात आला आहे.




जी.सी २६ मध्ये मुलांचा सहभाग



कथा - १

आम्ही गावातील कचऱ्याच्या समस्या वरती काम करण्यास सुरवात केली . लोंकाना याबाबत माहिती देण्यास सुरवात केली. आम्ही सुरवातीला गावामध्ये कचऱ्याच्या समस्या बाबत रॅली काढण्याचे ठरवले त्यासाठी आम्ही तयारी केली. आम्ही सुरवातीला काही पोस्टर तयार केले. गावामध्ये आम्ही गटाने रॅली काढली यामध्ये लोकांना कचऱ्याच्या समस्या बाबत , त्यासाठी आपण काय केले पाहिजे, आपल्याला काय त्रास होतो अश्या मुद्द्यावर भर देऊन जनजागृती केली. म्हणजे आम्ही गावामध्ये असलेल्या समस्या बाबत लोकांना सांगण्यास , त्यांना माहिती देण्यास सुरवात केली होती. आम्ही साधारण तीन-चार वेळेपेक्षा जास्त वेळेस रॅली काढली आणि जनजगृती केली होती.

आम्ही युवा गट एकत्र येऊन एके दिवशी गावातली ज्या समस्या आहेत त्याबाबत रीतसर अर्ज केला आणि तो अर्ज घेऊन आम्ही आमच्या ग्रामपंचायत मध्ये गेले. त्यांना गावामध्ये असलेल्या समस्या सांगितल्या. आम्ही दिलेल्या ग्रामपंचायत मधील अर्जाबाबत आम्हाला एक चांगली बातमी कळाली कि , आपल्या गावामध्ये कचरा साठवण्यासाठी किंवा तो टाकण्यासाठी काम सुरु केले जाणार आहे. अधिक माहिती घेतली असता आम्हाला असे सांगण्यात आले कि यासाठी आपण दोन औध बांधत आहोत. काही दिवसात गावामध्ये कचरा टाकण्यासाठी औध बांधले गेले आणि एक प्रकारे आम्ही युवा गट करत असलेल्या कामाला आम्हला यश मिळाले. आता आमच्या गावामध्ये कचऱ्याच्या समस्या बाबत चांगले काम झाले आहे. आम्ही ग्रामपंचायत मध्ये दिलेल्या अर्जाचे आज कामात रूपांतर झाले हे आमच्यासाठी महत्वाचे होते. आम्हाला भविष्यात पुढील काम करण्यासाठी हे सर्व प्रेरणा देणारे होते.

कथा २-

आमचा मुलींचा एक गट आहे आणि आम्ही आमच्या वस्ती मध्ये असलेल्या समस्या सोडवण्याचे काम करत आहोत. वस्ती मध्ये कचऱ्याची मोठी समस्या होती, लोक रस्त्यावर, गल्लीं मधील कोपऱ्यावर, रस्त्याच्या कडेला कचरा टाकत होते. यामुळे वस्ती घाण दिसत होती, आरोग्याच्या समस्या निर्माण होत होती. आम्ही यासाठी सुरवातीला वस्ती मध्ये रॅली काढून कचऱ्याच्या समस्या बाबत जनजागृती केली. लोकांना हे सांगितले कि आपण कचरा बाहेर फेकल्यामुळे काय त्रास होतो आहे, आपल्या वस्ती मध्ये आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. वस्ती मध्ये कचरा समस्या सोडवणायसाठी काही वेगळं काम करू शकतो का, याबाबत देखील आम्ही मुली चर्चा करत होतो. त्यावेळी आम्ही या समस्या बाबत वस्ती मध्ये असलेल्या पुणे महानगर पालिकेच्या आरोग्य कोठी येथे जाऊन आम्ही आमची तक्रार सांगितली आणि आपण यावरती काम सुरु करावे जे ने करून आम्हाला यांचा त्रास होणार नाही.

काही दिवसांनी आम्ही मुलींनी पथ - नाटकाच्या माध्यमातून पुन्हा वस्ती जनजागृती केली. पण या यावेळी आम्ही कचरा हीच समस्या न घेते वस्ती मध्ये असलेले इतर समस्या जसे कि, व्यसन, मुलांचे अधिकार, शिक्षण, आरोग्य, खेळण्याचा अधिकार या समस्या वरती देखील जनजागृती केली. आम्ही जे काम करत होतो त्यांचा वस्ती मध्ये एक चांगला परिणाम आम्हाला दिसत होता.

वस्ती मध्ये असणारे नागरिक आम्हाला सहकार्य करू लागले होते. आता आम्ही कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी तसेच एक आगळा-वेगळा उपक्रम म्हणून वस्ती मध्ये झाडे लावण्याचे ठरवले. आम्ही गटामध्ये याबाबत चर्चा केली आणि हे कसे करता येईल हे देखील ठरवले. आम्ही यासाठी जुन्या वस्तू वापरण्याचे ठरवले, यासाठी आम्ही आमच्या भागातही भंगार दुकानांमध्ये जाऊन त्या ठिकाणी मिळणाऱ्या जुन्या रंगकामातील बकेट, पाण्याचे मोठे कॅन अश्या वस्तू विकत घेतल्या आणि त्या वापरण्याचे ठरवले. महत्वाचे म्हणजे हे सगळं काम जुन्या वस्तू वापरून होणार होत तर त्यामुळे पैसे आणि पर्यावरणासाठी देखील महत्वाचे होते. नंतर आम्ही त्यामध्ये लावण्यासाठी झाडे खरेदी केली. त्या विकत घेतलेल्या बकेट वरती जनजागृती करण्याच्या उद्देश्याने आम्ही काही घोषवाक्य देखील लिहली.

आम्ही हे करत असताना आमच्या भागातील घन-कचरा सहाय्यक आयुक्त यांना भेटून आम्ही करत असलेल्या कामाची त्यांना माहिती दिली. आणि जो उपक्रम आम्ही घेत आहोत त्याची माहिती देऊन तुम्ही देखील उपस्थित राहावे हि विनंती केली. त्यानंतर प्रत्यक्ष्य वृक्षरोपण करण्याच्या दिवशी घन - कचरा व्यवस्थापन आयुक्त आमच्या वस्ती मध्ये आले आणि त्यांच्या हस्ते आमच्या वस्ती मध्ये वृक्षारोपण केले. त्यावेळी आमच्या वस्ती मध्ये असलेल्या समस्या बाबत आम्ही त्यांना माहिती दिली. आमहाला काय त्रास होतो हे देखील आम्ही त्यांना सांगितले , यावेळी नागरिकांनी देखील त्यांना समस्या सांगितल्या होत्या. यावेळी त्यांनी त्याच वेळी संबंधित अधिकारी , कर्मचारी याना याबाबत विचारणा केली आणि वस्ती मध्ये रोज साफसफाई झाली पाहिजी अश्या स्वरूपाच्या सूचना दिल्या. आम्ही राबवलेल्या छोटाश्या उपक्रमामुळे आमच्या वस्ती मध्ये असणाऱ्या समस्या सुटण्यासास मदत झाली होती. एक युवक गट कश्या प्रकारे काम करू शकतो आणि त्यामुळे कसा बदल होतो हे आम्हाला अनुभवता आले.

केवळ शैक्षणिक हेतूसाठी आणि खाजगी वितरणासाठी

**संपादक**

**मंगेश निकम : पर्यावरण मित्र**

C/o Centre for Environment Education,
Maharashtra State office
1 & 2 Pinewood Apartment, S. No. 233/1/2, Vidhate Colony,
Ambedkar Chowk, Near Vimal Darshan Society, Dnyaneshwar
Murkute Path, Aoundh, Pune - 411067

Mo. No. – 9527285607 Email: Mangesh.enikam@gmail.com

**सहायक संपादक**

**फाल्गुनी जोशी : पर्यावरण मित्र**
502, Raj Avenue, Near Metro Rail Station
Thaltej Cross Road, Thaltej Ahmedabad -380059 (Gujrat)
Phone No: 079-26851321
Email ID: paryavaranmitra@yahoo.com

Website: www.paryavaranmitra.org.in

Mo. No.- 9714839280